# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur@dtemaharashtra .gov.in Website : rdtenagpur.org.in

कालमर्यादित

इमेलव्दारे / सकंतस्थळावर

क्रमांक : तंशिस / विकाना / शै.वि / इ.बी.सी / २०१७–१८ / २०१८/1769

दिनांक : 21 FEB 2018

प्रति,

प्राचार्य / संचालक,

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय:— शैक्षणिक वर्ष २०१७–१८ करीता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना या योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणेबाबत.

संदर्भ:— १) संचालक, तंत्रशिक्षण म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१८ / तंशिस / जाहिरात / २०१८ / ६०, दि. १६ / ०२ / २०१८.

२) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण—२०१७ प्र.क्र. ४६५ / तांशि—४, दि. १४ / २ / २०१८.

३) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक.टीईएम —२०१६ प्र.क्र. ५५९ / तांशि—४, दि. २१ / ०६ / २०१७.

४) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण—२०१७ प्र.क्र. ३३२ / तांशि—४, दि. ०७ / १० / २०१७.

५) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण—२०१७ प्र.क्र. ३३२ / तांशि—४, दि. १३ / ११ / २०१७.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१ नुसार मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणा—या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमार्फत प्रवेश घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्याकडून ऑनलाईन पध्दतीने खालील योजनांसाठी अर्ज मागविण्यांत आले आहेत.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना.

२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.

सोबत तंत्रशिक्षण संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिरात जोडली असून त्यात नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांचे शैक्षणिक वर्ष २०१७–१८ करीताचे पात्र विद्यार्थ्याचे अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरण्यांबाबत व त्यांची छाननी करणे बाबतची कार्यवाही विहित मुदतीमध्ये करण्यांत यावी.

उपरोक्त दोन्ही योजनासाठीचे पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.सदर योजनांची माहिती आपल्या संस्थेच्या दर्शनी भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी. तसेच, उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्रमांक ३ ते ५ मध्ये नमूद केलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार पात्र विद्यार्थ्यापैकी एकही पात्र लाभार्थी विद्यार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संस्था प्रमुखांनी घ्यावी. यासाठी संचालनालयाने जाहीर केलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,

नागपूर.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६१७९६९, फॅक्स : ०२२-२२६९०००

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in website: www.dtemaharashtra.gov.in


का.क्र १८ /तंशिसं/जाहीरात/२०१८/६० दिनांक: १६.०२.२०१८

## तंत्रशिक्षणातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनाकरिता अर्ज : २०१७-१८

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण- २०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४, दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ नुसार मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणा-या आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (CAP) प्रवेश घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने खालील योजनांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

### अ. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक व परीक्षा शुल्कांच्या ५० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येईल.

### ब. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद व नागपूर) संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु. ३,०००/- व राज्यातील इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु. २,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय राहील.
- इतर विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाखापर्यत असल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रतिमहा रु. ३००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय राहील.

टिप :- १) पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.

२) वरील योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. त्या करिता विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड नंबर बँक खात्याशी संलग्नित करुन घ्यावे.

### वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-

सन २०१७-१८ साठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी [**ज्यांनी** www.mahadbt.gov.in **या महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी सुध्दा**] वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज www.dtemaharshtra.gov.in या संकेतस्थळावर सुचनांचे पालन करुन संपुर्ण अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन पध्दतीने भरावे.

| अ.क्र. | कार्यपध्द्ती | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | सर्व पात्र विद्यार्थ्यांनी www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे. | १७-०२-२०१८ | ०३-०३-२०१८ |
| २ | संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करुन सर्व अर्जांची छाननी करणे. | २०-०२-२०१८ | १२-०३-२०१८ |
| वेळापत्रकात काही बदल झाल्यास संकेतस्थळावर देण्यात येईल. | | | |

सर्व संस्थाच्या प्राचार्यांना / संचालकांना सुचना देण्यात येते की, उपरोक्त योजनांची माहिती संस्थांच्या दर्शनी भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी, सर्व विद्यार्थ्यांना वरील योजनांची माहिती द्यावी, पात्र विद्यार्थांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेण्यात यावे व भरलेल्या अर्जांची पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत छाननी करावी.

सही /-
(डॉ. अभय वाघ)
नोडल ऑफिसर तथा संचालक,
तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई